स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव


भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

• बीड • बुधवार, दिनांक २५ मार्च २०२६ • वर्ष २१ वे • अंक : ५२ • पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com • किंमत ३ रुपये



# भोंदू खरात प्रकरणात प्रामाणिकपणे कारवाई केली तर डझनभर मंत्री, दोन डझन अधिकारी जेलमध्ये दिसतील!!

- मंत्री चंद्रकांत पाटील यांचे ही या भोंदू खरातशी अत्यंत जवळचे संबंध! त्यांनीही मुख्यमंत्री होण्यासाठी अघोरी पुजा केली!!
- पक्षातील हितशत्रू आणि मित्रपक्षातीलच सहका-यांनी देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्रीपद घालवण्यासाठी भोंदू खरातकडून केली पूजा!!
- खरेतर हे बेजबाबदार सरकार असून, लोकांना अंधारात ठेवून फक्त सत्ता उपभोगण्यात यांना रस : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

## फडणवीस यांचे मुख्यमंत्रीपद घालवण्यासाठी तंत्र, मंत्र, पूजा केल्याने भोंदू खरातवर कारवाई!!

**मुंबई : प्रतिनिधी**
**भाजपचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्री होण्यासाठी भोंदू अशोक खरात याच्याकडे जाऊन अघोरी पुजा केली केली होती, असा खळबळजनक दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. सपकाळ यांच्या या आरोपामुळे भाजपमधील अंतर्गत राजकारण चांगलेच तापण्याची शक्यता आहे. भोंदू अशोक खरातच्या कारनाम्यांमुळे अवघ्या महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. भोंदू खरातचे अनेक नेते व अधिकाऱ्यांशी साटेलोटे आढळले आहे. या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना आपल्या पदाचा राजीनामाही द्यावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपरोक्त दावा केला आहे.**



### मंत्री चंद्रकांत पाटलांनी केली अघोरी पुजा!!





मंत्री चंद्रकांत पाटील यांचे ही या भोंदू खरातशी अत्यंत जवळचे संबंध होते. त्यांनीही मुख्यमंत्री होण्यासाठी या बाबाकडून अघोरी पुजा केल्याची माहिती मिळते आहे. भोंदू बाबाचे कारनामे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना सहा महिन्यांपासून माहित होते. फडणवीसांच्या आजूबाजूचे लोक, मंत्रीमंडळातील सहकारी यांचे खरातशी संबंध असल्यानेच माहिती मिळूनही फडणवीसांनी काही कारवाई केली नव्हती. पण त्यांच्या मित्रपक्षातील सहका-यांनी देवेंद्र फडणवी यांचे मुख्यमंत्रीपद घालवण्यासाठी खरातकडून तंत्र मंत्र व अघोरी पूजा केल्यानेच फडणवीसांनी भोंदू बाबा अशोक खरात विरोधात कारवाई सुरु केली. भोंदू बाबाच्या निमित्ताने ते आता मित्र पक्ष आणि पक्षातील हितशत्रूना ब्लॅकमेल करत आहेत, असे सपकाळ म्हणाले.

### लोकांना अंधारात ठेवून फक्त सत्ता उपभोगण्यात यांना रस!!

काल संसदेच्या पटलावर खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले की, देश गंभीर संकटात आहे. कोरोना सारखी एकजूट आता दाखवावी लागेल. खरेतर हे बेजबाबदार सरकार आहे, लोकांना अंधारात ठेवून फक्त सत्ता उपभोगण्यात यांना रस आहे. पंतप्रधानांनी राजीनामा देऊन भारतीय जनतेला होणाऱ्या त्रासातून मुक्त केलं पाहिजे, असे सपकाळ म्हणाले.

### अशोक खरातच्या इशानेश्वर मंदिराला देवेंद्र फडणवीस सरकारकडून 1.5 कोटींचा निधी

● एका पोस्टमध्ये सपकाळ म्हणाले की, सरकारने भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात प्रामाणिकपणे कारवाई केली तर डझनभर मंत्री आणि दोन डझन अधिकारी जेलमध्ये जातील अशोक खरातच्या इशानेश्वर मंदिराला देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने 2018 साली 1.5 कोटी रुपयांचा निधी दिला होता.

● फडणवीसांच्या कार्यालयात त्यावेळी कार्यरत असणारे व आता म्हाडाचे अधिकारी मिलिंद बोरीकर यांचे ही या बाबांशी अत्यंत जवळीकीचे संबंध आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचेही भोंदू सोबत फोटो समोर आले आहेत.

### मोदींनी राजीनामा देऊन जनतेला त्रासमुक्त करावे : हर्षवर्धन सपकाळ

हर्षवर्धन सपकाळ यांनी देशातील इंधन संकटावरून थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवरही निशाणा साधला आहे. ते म्हणाले, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी व एकंदरीत काँग्रेस पक्ष गेले तीन आठवडे झाले सांगतोय की, देश गंभीर संकटात आहे. केंद्र व राज्य सरकारने उपाययोजना करण्याची गरज आहे. पण सत्ताधारी पक्षातील जबाबदारीच्या पदावर बसलेल्या व्यक्तीच काँग्रेस पक्ष अफवा पसरवतोय, जनतेची दिशाभूल करू नका, यासारख्या बाता मारण्यात व्यस्त होत्या.



## बीड जिल्ह्यामध्ये इंधन साठा पर्याप्त स्वरुपामध्ये;नागरीकांनी इंधनासाठी पेट्रोल पंपावर गर्दी करणे टाळावे

➤ अफवांवर विश्वास ठेऊ नका जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन

**बीड / प्रतिनिधी :**
सध्यस्थितीमध्ये आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या तणावपुर्ण पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात व बीड शहरात इंधन तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये कार्यरत सर्वसाधारणपणे सर्वच पेट्रोल पंपावर अतिरीक्त स्वरुपामध्ये वाहनांमध्ये इंधन साठा करणेसाठी गर्दी होऊन पेट्रोल पंपावर वाहनांची गर्दी झालेली आहे. या संदर्भात सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, बीड जिल्ह्यामध्ये पेट्रोल व डिझेलचा ● पान ३ वर...





## मद्यप्रेमींच्या खिशाला लागणार कात्री, बिअर आणि दारुच्या किमती वाढणार?

मुंबई : दारु पिणाऱ्यांच्या खिशाला लवकरच कात्री लागू शकते. कारण दारुच्या किमती वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वाढत्या उत्पादन खर्चामुळे भारतीय मद्य बाजारपेठेत किमती वाढण्याचे संकेत मिळत आहेत. बिअर उत्पादकांनी आगामी उन्हाळ्यात पुरवठा विस्कळीत होण्याचा इशारा दिला असून, मद्य उत्पादक संघटनांनी राज्यांकडे भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या (IMFL) किमती सुधारण्याची विनंती केली आहे.

दारू दरवाढीची मुख्य कारणे



गेल्या काही आठवड्यांत पॅकिंग मटेरियलच्या किमतीत १०-१२ टक्के वाढ झाली आहे. काचेच्या बाटल्यांच्या किमती २० टक्क्यांनी वाढल्या आहेत, तर अॅल्युमिनियमच्या टंचाईमुळे बिअर कॅन्सच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. इंधन दरवाढीमुळे मालवाहतूक खर्च १० टक्क्यांनी महागला असून, त्याचा थेट परिणाम मद्याच्या अंतिम किमतीवर होत आहे.

## मावलाई श्री राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्कार डॉ. गणेश ढवळेंना जाहीर

➤ **बीड / प्रतिनिधी :**
गेवराई तालुक्यातील मावलाई युवक क्रीडा मंडळ व व्यायाम शाळा ब-हाणपुर यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १७ वर्षांपासून मावलाई देवी यात्रेनिमित्त पत्रकारिता, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना "मावलाई श्री राज्यस्तरीय पुरस्कार" प्रदान करण्यात येतो.



यावर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना "मावलाई श्री समाजसेवा पुरस्कार २०२६" जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील मूलभूत सुविधा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न, वृक्षारोपण व संवर्धन तसेच पर्यावरण संरक्षण यांसारख्या विविध सामाजिक विषयांवर सातत्याने अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून शासन दरबारी पाठपुरावा केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा ब-हाणपुर येथे दि. ०३ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यावेळी शशिकांत शिंगारे यांच्या हस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमास प्रमोद कुलकर्णी, दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, अविनाश वाघिरकर, धनंजय बजगुडे तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड आर. एम. मोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच पाडळशिंगी रितेश साबळे, मंडळ अध्यक्ष विष्णू यादव, सचिव भागवत वराट, पांडुरंग पवार, संतोष वराट यांनी केले आहे. दरम्यान, हा राज्यस्तरीय सन्मान जाहीर झाल्याबद्दल डॉ. गणेश ढवळे यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

**संतापजनक प्रकार** ➤ रुग्णालय परिसरात तणावाचे वातावरण; पोलिस घटनास्थळी दाखल

## स्वाराती रुग्णालयात सुरक्षा रक्षकाकडून अॅड.इस्माईल गवळी सह साथीदारास बेदम मारहाण

➤ **अंबाजोगाई / प्रतिनिधी :**
शहरातील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात महाराष्ट्र सुरक्षा रक्षक बलाच्या कर्मचाऱ्यांकडून अॅड. इस्माईल गवळी तसेच एका ऑटोचालकास बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे रुग्णालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, किरकोळ वादातून हा प्रकार घडला. रिक्षा चालकास सुरक्षा रक्षक मारहाण करत असल्याचे गवळी यांना समजल्या नंतर ते सोडवण्यास गेले नंतर त्यांना सुद्धा मारहाण करण्यात आली.







या घटनेत अॅड. इस्माईल गवळी व संबंधित ऑटोचालक जखमी झाले असून त्यांच्यावर येथेच उपचार सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणत पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणी मारहाण करणाऱ्या सुरक्षा रक्षकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. घटना घडल्यानंतर अंबेजोगाई येथील सर्वच पक्ष संघटनेचे कार्यकर्ते, विधिज्ञ परिसरात जमा झाले होते. व अधिष्ठाता यांची भेट घेऊन कारवाईचे मागणी करत आहेत. हा प्रकार सर्व सामान्याबाबत रोज घडत आहे, पण याची कोठे दाद मिळत नाही. अशी चर्चा नातेवाईकांमध्ये ऐकायला मिळाली. रुग्णालय परिसरात अशा प्रकारच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# सिलिंडर आता ३५ दिवसांनी बुक करता येणार!

# राज्यात गॅस वितरण विभाग फेल; तक्रारी वाढल्या



मुंबई : भारतात कुठे इंधनाचा पुरवठा अपुरा पडतोय तर कुठे गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवतो आहे. गॅस सिलिंडरसाठी अक्षरश: भल्यामोठ्या रांगा लागल्या आहेत. लोक तासंतास उभं राहून गॅस सिलिंडर घेत आहेत. तुम्ही घरगुती गॅस सिलिंडर वापरत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. गॅस कंपन्यांनी आता सिलिंडर बुकिंगमधील अंतर वाढवण्याचा निर्णय घेतला असला तरीही राज्यात पुरवठा विभागाने वितरकांना खुली सुट दिल्याने ते मनमानी कारभार करत आहेत. लोकांचे गॅस बुकींग होऊनही गॅस मिळत नाही. पुरवठा विभाग तक्रारींकडे लक्ष देत नाही त्यामुळे ग्राहकांत संताप दिसून येत आहे.



नव्या नियमांनुसार, ग्राहकांना ठराविक कालावधी पूर्ण झाल्याशिवाय पुढच्या सिलिंडरसाठी बुकिंग करता येणार नाही. विशेषत: इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या ग्राहकांवर याचा थेट परिणाम होणार आहे. १४.२ किलोच्या घरगुती सिलिंडरसाठी आता बुकिंगमधील अंतर वाढवण्यात आलं आहे. ज्या ग्राहकांकडे डबल सिलिंडर कनेक्शन आहे, त्यांना आता एका सिलिंडरनंतर दुसरा सिलिंडर बुक करण्यासाठी किमान ३५ दिवस वाट पाहावी लागेल. यापूर्वी ही मर्यादा २५ दिवसांची होती. गॅसची साठेबाजी रोखण्यासाठी आणि सर्वांना वेळेवर पुरवठा व्हावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

### उज्ज्वला लाभार्थी आणि ग्रामीण भागासाठी वेगळे नियम

गॅस कंपन्यांनी ग्राहकांच्या श्रेणीनुसार वेगवेगळे नियम लावले आहेत. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना आता पुढच्या बुकिंगसाठी ४५ दिवस प्रतीक्षा करावी लागेल. सिंगल सिलिंडर कनेक्शन म्हणजे ज्याच्याकडे एकच गॅस सिलिंडर आहे, ते डिलिव्हरीनंतर २५ दिवसांनी नवीन बुकिंग करू शकतील. ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी हा नियम अधिक कडक केले आहेत.

त्यांना पुढील बुकिंगसाठी ४५ दिवसांचे अंतर ठेवणे अनिवार्य आहे. OTP आणि e-KYC हे महत्त्वाचं असेल. डिलिव्हरीच्या वेळी ओटीपी सांगणं आता बंधनकारक आहे. तसेच, ज्यांनी ई-केवायसी पूर्ण केलेली नाही, त्यांचे बुकिंग रद्द केले जाऊ शकते.

### १२ सिलिंडरचा कोटा संपला तर काय होणार?

सरकार एका वर्षात १२ सिलिंडरवर सबसिडी देते. जर एखाद्या ग्राहकाने आपला हा कोटा पूर्ण केला असेल, तर १३ व्या सिलिंडरसाठी त्यांना गॅस कंपनीच्या ॲपवर जाऊन काही प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. यामध्ये कुटुंबातील सदस्यांची संख्या, घरी पाहुणे आले आहेत का किंवा घरात काही कार्य आहे का, अशी माहिती द्यावी लागेल. या माहितीची पडताळणी केल्यानंतरच कंपनी अतिरिक्त सिलिंडर देण्याचा निर्णय घेईल.

# छत्रपती संभाजीनगर पुरवठा विभागामुळेच संभ्रम वाढल्याच्या तक्रारी; ग्राहकांचा छळ सुरूच

## ➤ फोन बंद करत गॅस बुकींग करत नसल्याने सरकारची बदनामी; पुरवठा विभागाचे अधिकाऱ्यांनी ऑफसला भेट दिल्याने फोन बंद केल्याचे सांगितले

## पुरवठा विभागाच्या पाठबळाशिवाय गॅस वितरकांची मनमानी कशी चालू शकते?



➤छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

देशभरात गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, या परिस्थितीत नागरिकांना दुहेरी फटका बसत असल्याचे चित्र आहे. एकीकडे सिलेंडरसाठी ग्राहकांना दिवसन्‌दिवस एजन्सीच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत, तर दुसरीकडे सीडको, बळीराम पाटील शाळेजवळ असलेल्या इण्डेन गॅस एजन्सीने ऑफिसची सर्व फोन सेवा बंद करून ग्राहकांचे टेन्शन वाढवले. फोन करून करून थकल्यानंतर नागरिक दुकानावर चकरा मारत आहेत. येथील काहीजण अशा नागरिकांना बाजूला घेऊन जादा दरात गॅस सिलिंडर विक्री करत अल्याच्या तक्रारी आहेत. केवळ याच कारणामुळे गॅस एजन्सीने आपले फोन व मोबाईल नंबर बंद करून ठेवली आहेत. काही जणांना १३ तारखेला बुकींग करून त्यांची ऐनवेळी बुकींग केली नसल्याचे सांगत आहेत. काहींना गॅस बुकींग केल्याचा मॅसेज येऊनही त्यांना दहा दिवस गॅस मिळत नाही आणि नेमके गॅस कधी येणार आहे हे विचारण्यासाठीऑफिसला फोन केल्यानंतर ऑफिसने सर्व नंबर व मोबाईल नंबर बंद करून ठेवली आहेत. वारंवार मोबाईल करून चौकशी करणाऱ्या ग्राहकांचे नंबर ब्लॉक करण्यात आले आहेत. नागरिकांनी या एजन्सीला मेल टाकून तक्रार केल्यानंतर मेल चे एकदा उत्तर दिल्यानंतर पुन्हा गॅस दिला जात नाही अशा तक्रारी असून तात्काळ या एजन्सीवर कार्यवाही करण्याची मागणी ग्राहकांकडून होत आहे. हे ऑफिस एजन्सी मालकाने ऑफिस बॉय व कर्मचाऱ्यांच्या भरवशावर सोडल्याने ग्राहकांत संभ्रम निर्माण होत आहे.

### पुरवठा विभागाचे नियंत्रण नाही

● प्रचंड गॅस टंचाई अल्याचे भासवून गॅस चा काळाबाजार केल्याच्या तक्रारी असूनही पुरवठा विभागाकडून गॅस एजन्सीच्या मनमानीला चाप लावला जात नाही. लोकांच्या तक्रारींकडे विभागाचे सपशेल दुर्लक्ष केले जात आहे. ग्राहकांना बुकींग करूनही गॅस दिला जात नाही. त्यांचे फोन उचलले जात नसल्याने त्यांना समाधानकारक उत्तर मिळत नाही.

# कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध - माजी मंत्री बदामराव पंडित

## संगकलेचा...रंग प्रतिभेचा...मन मर्दिना ते..... पाटलांचा बैलगाडा सुखद रसांची मेजवानी

गेवराई : प्रतिनिधी

येथे दिनांक २० – २१ व २२ या तीन दिवसीय गौराई कला महोत्सव २०२६ चे स्वरसिद्धी फाउंडेशन धोंडराईच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. प्रतिवर्षी लोकनेते बदामराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानीचा लाभ गेवराई करांना होत असतो.

याही वर्षी जवळपास सहा कला प्रकारामध्ये १०० सहभागी, कलावंतांच्या समूहातून, निष्णात प्रतिभावंत कलावंतांचा सन्मान व सत्कार यानिमित्ताने संपन्न झाला. गौराई कला महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन युवा नेते यशराज भैय्या पंडित यांच्या हस्ते संपन्न झाले. सिद्धेश्वरी ताई कोकाटे व त्यांच्या सर्व कुटुंबीयांनी गेल्या पाच वर्षापासून आबांच्या वाढदिवसानिमित्त केलेल्या विविध कार्यक्रमाचा आढावा देऊन त्यांनी स्वरसिद्धी फाउंडेशन च्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही युवा नेते यशराज पंडित यांनी दिली.

शुभारंभ प्रसंगी जेष्ठ नाटककार एडवोकेट सुभाष निकम, जेष्ठ कलावंत प्रकाश दावणगिरे, चित्रपट अभिनेते प्रशांत रुईकर, लोककलेचे विलासजी सोनवणे, नगरपरिषद सभापती शहदादभाई, सचिन काकडे, संगीत शिक्षक ज्ञानेश्वर मोटे, नृत्यदिग्दर्शक दीपक गिरी, रामदास भाऊ कोकाटे, एडवोकेट प्रशांत वाघमारे, आर के थोरात, आदि उपस्थित होते.

दीप प्रज्वलन करून व सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून या रंगारंग कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

पहिल्या सत्रात शास्त्रीय गायन व सुगम गायन या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सकस अशा पद्धतीचे सादरीकरण सुगम आणि शास्त्रीय प्रकारात सादर केले व रसिक प्रेक्षकांची दाद मिळवली. दुपारच्या सत्रामध्ये वैयक्तिक नृत्य स्पर्धेला सुरुवात झाली आणि संपूर्ण सभागृह स्पर्धेने दणाणून सोडले. एक से बढकर एक परफॉर्मन्स या वैयक्तिक नृत्य स्पर्धेमध्ये सादर झाला.

अलीकडच्या काळातील सर्व प्रसिद्ध अशा लावण्यांचा भरगच्च कार्यक्रम आपण पाहत आहोत की काय? असा भास क्षणभर रसिक प्रेक्षकांना या ठिकाणी झाला.

चिमुकल्यांनी आपल्या प्रचंड मेहनतीने सादर केलेल्या या कलेला रसिकांनी देखील प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

यादरम्यान कलावंतांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी रोहित भैया पंडित व त्यांच्या सौभाग्यवती स्वरूपाताई पंडित यांनी कार्यक्रम ठिकाणी भेट देऊन कलावंतांची कौतुक केले.

व्यासपीठावरील कला वेगळी आणि दैनंदिन जीवनात जगण्याची कला वेगळी असा मार्मिक संदेश यावेळी युवा नेते रोहित भैया पंडित यांनी कलावंतांना दिला.

तर एक महिला म्हणून आमच्या क्षेत्रात असणाऱ्या सर्व महिला कलावंतांचे असणारे प्रश्न सोडविण्यासाठी पंडित परिवार सदैव आपल्या पाठीशी आहे अशी ग्वाही माजी नगरसेविका स्वरूपाताई पंडित यांनी यावेळी दिली.

यादरम्यान स्वरसिद्धी फाउंडेशनचे सहयोगी सदस्य असलेले आर के थोरात यांच्या मार्गदर्शनाने





वारोळा, माजलगाव तालुका येथील तुळजाभवानी लोककलावंत समूह यांच्या वतीने आराधी गीत गायनाचा कार्यक्रम देखील सादर झाला, सोबतच चकलांबा येथील संत वामन भाऊ महिला भक्तिमंडळाने आपले गीते या ठिकाणी सादर केली.

संपूर्ण रंगा रंग कार्यक्रम दिनांक २० तारखेपासून ते २३ तारखेपर्यंतच्या झालेल्या विविध स्पर्धांची उत्कंठा आता शिगेला पोहोचली होती, व मुख्य कार्यक्रम शिल्लक होता तो पारितोषिक वितरणाचा. बदामराव आबा पंडित यांच्या आगमनानंतर त्यांचे प्रथम वाढदिवसानिमित्त हार व शाल घालून स्वरसिद्धी फाउंडेशन च्या वतीने कोकाटे कुटुंबीयामार्फत यथोचीत स्वागत केले. या स्वागतानंतर शुभेच्छा पर बोलताना बदामराव पंडित म्हणाले की गेवराई तालुक्याला खूप मोठी सांस्कृतिक परंपरा आहे. गेल्या अनेक दशकांपासून या सांस्कृतिक परंपरेचे आम्ही साक्षीदार आहोत. स्वरसिद्धी फाउंडेशन यांनी धोंडराई येथे अनेक बालकलावंतांना घडवून गेले पाच वर्षापासून माझ्या वाढदिवसाला सातत्याने कार्यक्रम आयोजित करून कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देतात, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन या निमित्ताने मी करतो. तसेच गेवराई मतदार संघातील सांस्कृतिक क्षेत्रात सर्वत्र कार्यरत असणाऱ्या व्यक्तींचे देखील मी अभिनंदन करतो व हा वारसा अशाच पद्धतीने पुढे टिकावा यासाठी माझा पूर्ण पाठिंबा राहील.

उद्घाटन प्रसंगी व समारोप प्रसंगी ॲडव्होकेट सुभाष निकम यांचे कलावंतांना मार्गदर्शन प्राप्त झाले समारोप समारंभाच्या कार्यक्रमास शिवसंग्राम पक्षाचे अध्यक्ष कैलास जी माने, राजाभाऊ तेलुरे, संदीप निकम, माजी सरपंच संतराम काळे, ह भ प तुळशीराम महाराज आतकरे, नाट्य कलावंत प्रा राजेंद्र बरकसे, विष्णुप्रसाद खेतरे, उमापूर येथील मुख्याध्यापक धर्मराज करपे धोंडराई येथील मुख्याध्यापक देशपांडे पत्रकार सुदर्शन देशपांडे, शेख खाजाभाई, काकासाहेब काकडे, संदीप देशपांडे, सोशल मीडियाचे सोमनाथजी मोटे, सर्व मान्यवर परीक्षक, जेष्ठ कलावंत, स्पर्धक, स्पर्धकांचे पालक, व मोठ्या प्रमाणात रसिक प्रेक्षक यावेळी उपस्थित होते

कला संस्कृतीचा वारसा, प्रतिभेचा महोत्सव असणाऱ्या या गौराई कला महोत्सव २०२६ चा निकाल याप्रमाणे यावेळी घोषित करण्यात आला

२० मार्च : प्रतिभेच्या सागरातून उमटले

**● चित्रकलेचे रंग आणि चित्रकला स्पर्धा हे विजेते ठरले**

**प्रथम क्रमांक** :वेदांत सुनील कापसे
**द्वितीय क्रमांक** : आरोही रमेश राऊत
**तृतीय क्रमांक** : चिन्मय सुदर्शन देशपांडे
**उत्तेजनार्थ** : गौरी सचिन देशपांडे

तर छत्रपती शिवाजी महाराज या विषयावरील निबंध स्पर्धेचे पारितोषिक विजेते ठरले

निबंध स्पर्धा यांनी

**प्रथम क्रमांक** :रुपाली बाबासाहेब क्षीरसागर
**द्वितीय क्रमांक** :परिदी वैजीनाथ पाखरे
**तृतीय क्रमांक** : राशी रामेश्वर कदम
**उत्तेजनार्थ क्रमांक** : ईकरा नाजीम शेख

पुढे २१ व २२ मार्च रोजी घेण्यात आलेल्या शास्त्रीय गायनाचा गांभीर्यपूर्ण सूर, सुगम गायन, वैयक्तिक नृत्य व समोर रते अशा स्पर्धा प्रकारात खालील प्रमाणे विजेते ठरले

**शास्त्रीय गायन स्पर्धेत**

**प्रथम क्रमांक** :सुप्रिया संदीप गलांडे (राग – अल्हैया बिलावल बंदिश – सुमिरण कर भज राम नाम को ...)
द्वितीय क्रमांक :श्रीराज सौंदलकर ( राग – बिहाग झनन झनन तोरी बाजे पायलियाँ ..)
**तृतीय क्रमांक** :अर्णव मिथुन खडकीकर ( राग – काफी)

**● सुगम गायन स्पर्धेत**

**प्रथम क्रमांक** :विनायक कापसे (गीत – घे लल्लाटी भांडार ...)
**द्वितीय क्रमांक** : तनिष्का सुदर्शन देशपांडे ( नाट्यगीत – मन मंदिरा ,तेजाने ...)
**तृतीय क्रमांक** : संपदा विजय राजूरकर (नाट्यगीत – वद जाऊ कुणाला शरण ...)

समूह नृत्य स्पर्धेत

**प्रथम क्रमांक** : मंगळागौरी ग्रुप ( गेवराई ) मंगळा गौर ..
**द्वितीय क्रमांक** : सिद्धेश्वर विद्यालय ग्रुप ( माजलगाव ) लावणी – काटा रुतला गं...
**तृतीय क्रमांक** : राजमाता जिजाऊ ग्रुप रोहितळ ) आज गोंधळाला ये ...

वैयक्तिक नृत्य स्पर्धेत ( लहान गट )

प्रथम क्रमांक : अदिती गणेश बनगे (लावणी – चढविला पट्टा कमरे वरी ..)
**द्वितीय क्रमांक** : प्रांजल मनोज टाक (लावणी – मदन मंजिरी ...)
**तृतीय क्रमांक** :शुभ्रा ज्ञानेश्वर उदावंत (पाटलांचा बैलगाडा ...)
**उत्तेजनार्थ** : शरयू विक्रम घोरपडे (लावणी )

वयक्तिक नृत्य स्पर्धेत ( मोठा गट )

**प्रथम क्रमांक** :समृद्धी सतीश काकडे ( चढविला पट्टा कमरेवरी ..)
**द्वितीय क्रमांक** :संध्या अंकुश मुजमुले ( लावणी )
तृतीय क्रमांक :सोनाक्षी कैलास पवळे( मैं कोल्हापूर से आयी हूं..)
उत्तेजनार्थ : समृद्धी ज्ञानेश्वर जंगले( लावणी – चंद्र )

चित्रकला व निबंध स्पर्धा याचे परीक्षण कु अनुपमा रामदास कोकाटे, कु अश्विनी रामदास कोकाटे यांनी केले तर शास्त्रीय गायन व सुगम गायन या स्पर्धेचे परीक्षण ज्ञानेश्वर मोठे व विलास सोनवणे यांनी तर समूह नृत्य स्पर्धेचे परीक्षण एडवोकेट सुभाष निकम व दीपक गिरी यांनी केले. समोरसदरील स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराज संकुल, नगर परिषद गेवराई. येथे संपन्न झाली

उद्घाटन व समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव रामदास भाऊ कोकाटे यांनी तर सूत्रसंचालन नाट्य कलावंत प्रशांत रुईकर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुरस प्रसिद्धी फाउंडेशनच्या अध्यक्षा सिद्धेश्वरी कोकाटे यांनी केले सर्व विजेते आणि सहभागाबद्दल सर्व कलाकारांचे अभिनंदन...!!!

सांज दैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक – अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष



# प्रा. डॉ. विनायक देशमुख यांना भौतिकशास्त्र विषयातील भारत सरकारच्या पेटंटची मान्यता



➤ माजलगाव / प्रतिनिधी : भाशिप्र संस्थेच्या येथील सिद्धेश्वर महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील प्रा. डॉ. विनायक देशमुख यांना भारत सरकारचा "ऑप्टिकल स्पेक्ट्रम मेजरमेंट डिवाइस" याबद्दल पेटंट मान्यता मिळालेली आहे. यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात एक महत्त्वाची कामगिरी नोंदवली गेली असून "ऑप्टिकल स्पेक्ट्रम मेजरमेंट डिवाइस" या अत्याधुनिक उपकरणाला अधिकृत पेटंट मंजूर झाले आहे.

हे उपकरण प्रकाशाच्या विविध तरंगलांबी (wavelengths) अचूकपणे मोजण्यासाठी विकसित करण्यात आले आहे. प्रकाशाचे स्पेक्ट्रम विश्लेषण करून त्यातील गुणधर्म ओळखण्याची क्षमता या डिवाइसमध्ये आहे. विशेष म्हणजे, हे उपकरण अत्यंत संवेदनशील (high sensitivity) असून सूक्ष्म बदल देखील अचूकपणे टिपू शकते. त्यामुळे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकीय निदान, पर्यावरण निरीक्षण आणि औद्योगिक गुणवत्ता नियंत्रण यांसारख्या विविध क्षेत्रात याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होणार आहे. पेटंट मिळाल्यामुळे या शोधाला कायदेशीर संरक्षण मिळाले असून संशोधकांना त्यांच्या नवकल्पनेचा व्यावसायिक वापर करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. यामुळे उद्योग क्षेत्रात नवीन स्टार्टअप्स, उत्पादन विकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच, "मेड इन इंडिया" संकल्पनेला बळ मिळून देशाच्या वैज्ञानिक प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान होणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, सुरेंद्र रेदासणी, ॲड. विश्वास जोशी, अभय कोकड, प्रशांत भानप, पवन मानधने, तेजस महाजन, लक्ष्मीकांत जोशी, प्राचार्य मुकुंद देवर्षी, डॉ. शिवशंकर मिटकरी, उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक उत्तरेश्वर आनेवार, यांनी त्यांचे अभिनंदन व स्वागत केले आहे.

## बीड जिल्ह्यामध्ये इंधन साठा पर्याप्त स्वरुपामध्ये; नागरीकांनी इंधनासाठी पेट्रोल पंपावर गर्दी करणे टाळावे

● पान १ वरून ...साठा सद्यस्थितीमध्ये पर्याप्त प्रमाणामध्ये उपलब्ध असून इंधन पुरवठा सुरळीत सुरू आहे. काही पेट्रोल पंप चालकांनी त्यांना पेट्रोल व डिझेल प्राप्त होणाऱ्या पेट्रोलियम कंपन्यांना देयके उशिराने अदा केली त्यामुळे त्यांना इंधन साठा थोडा उशिराने प्राप्त झाला.

सर्वच पेट्रोल पंप कंपनीच्या विक्री अधिकारी / प्रतिनीधी यांना प्रशासनाच्या मार्फत इंधन पुरवठा सुरळीत ठेवणेकामी आवश्यक त्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

बीड जिल्हयामध्ये पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा असुन पुरवठा सुरळीत चालु आहे. कोणीही अफवांवर विश्वास ठेवून अनावश्यक साठा करू नये व पेट्रोल पंपावर अनावश्यक गर्दी टाळावी. चुकीच्या अफवा तसेच चुकीची माहिती पसरविणाऱ्यांवर योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

जिल्हा प्रशासन, तसेच ऑईल कंपन्या पेट्रोल व डिझेलचा साठा सुरळीत व कायम ठेवणेबाबत कटीबध्द आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# गॅस टंचाईचा फटका; माजलगावात हॉटेल व्यवसाय ठप्प होण्याच्या उंबरठ्यावर

## ➤ कोळशाकडे वळण वाढले, पण तोही महाग व दुर्मिळ





➤ अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी

शहरात घरगुती तसेच व्यावसायिक वापरासाठी आवश्यक असलेल्या गॅस सिलेंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस वितरण केंद्रांवर सकाळपासूनच लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसत असून, कडक उन्हात नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे.

सद्यस्थितीत जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीचा परिणाम इंधन पुरवठ्यावर होत असल्याचे दिसून येत आहे. पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे. त्यातच गॅसची कृत्रिम टंचाई निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

या परिस्थितीचा सर्वाधिक फटका माजलगावातील हॉटेल व्यावसायिकांना बसत आहे. अनेक छोटे–मोठे हॉटेल, चहाचे टपरी व नाश्ता सेंटर चालक गॅसअभावी व्यवसाय बंद करण्याच्या स्थितीत आले आहेत. रोजच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या या व्यावसायिकांसाठी ही परिस्थिती गंभीर ठरत आहे.

पर्याय म्हणून काही व्यावसायिकांनी पुन्हा पारंपरिक कोळशाच्या शेगड्यांचा आधार घेतला आहे. मात्र, कोळसा मिळवणेही सध्या कठीण झाले आहे. पूर्वी ५० रुपयांना मिळणारा कोळशाचा डबा आता ११० ते १२० रुपयांपर्यंत पोहोचला असून, त्यासाठीही खेड्यांकडे धाव घ्यावी लागत आहे.

दरम्यान, "धूरमुक्त घर" या शासनाच्या धोरणामुळे शहरांमध्ये चुलींचा वापर पूर्णपणे बंद झाला आहे. परिणामी सरपण जाळून कोळसा तयार करण्याची पारंपरिक पद्धतही लुप्त होत आहे, ज्यामुळे कोळशाची उपलब्धता आणखी कमी झाली आहे.

"आमचे संपूर्ण कुटुंब हॉटेल व्यवसायावर अवलंबून आहे. गॅस टंचाईमुळे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. शासनाने तातडीने उपाययोजना करून गॅसचा पुरवठा सुरळीत करावा किंवा पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी," अशी मागणी शहरातील हॉटेल व्यावसायिक महादेव एखंडे व प्रदीप एखंडे यांनी व्यक्त केली.

एकूणच, गॅस टंचाईमुळे माजलगावातील हॉटेल व्यवसायावर दुहेरी संकट ओढवले असून, तातडीने उपाययोजना न झाल्यास ही परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे

- गॅस सिलेंडरच्या तुटवड्यामुळे वितरण केंद्रांवर लांबच लांब रांगा
- हॉटेल, चहाचे टपरी व नाश्ता सेंटर चालक सर्वाधिक अडचणीत
- अनेक ठिकाणी व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ
- पर्याय म्हणून कोळशाच्या शेगड्यांकडे वळण
- कोळशाचे दर दुपटीने वाढले, उपलब्धता कमी
- "धूरमुक्त घर" धोरणामुळे पारंपरिक चुली बंद
- प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी
- माजलगाव शहरातील गॅस टंचाईमुळे निर्माण झालेली परिस्थिती आणि त्याचा हॉटेल व्यावसायिकांवर होणारा परिणाम

**विकासाचा मुद्दा बाजूला ठेवा आणि महिलांना सुरक्षित वातावरण द्या-विजयताई दहिवाल**

# संगमनेर तालुक्यातील चिमुरडीवरील 'ॲसीड अटॅक'मुळे महाराष्ट्रात तिव्र संताप; परळीत तहसिलदारांना निवेदन

## ➤ महाराष्ट्राच्या राष्ट्रीय महिला अध्यक्षा विजयताई दहिवाल आणि तालुका अध्यक्षा मधुरिताई दीक्षित यांचा संताप





➤ परळी वैजनाथ : प्रतिनिधी

सुवर्णकार भारती सेवा संस्थान महाराष्ट्राच्या राष्ट्रीय महिला अध्यक्षा विजयताई दहिवाल आणि तालुका अध्यक्षा मधुरिताई दीक्षित यांनी, चित्रताई, सुरेखताई, विद्याताई, मंगलताई, खोट्टाई आणि तारावती, श्री रामेश्वर कोकाटे व इतर अधिकाऱ्यांसह परळी वैजनाथ येथील तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले.

संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील रहिवासी ईश्वरी संजय दहळे यांच्यावर अज्ञात व्यक्तीने केलेल्या ॲसिड हल्ल्याचा आम्ही तीव्र निषेध करतो.

सुवर्णकार भारती सेवा संस्थेचे सर्व अधिकारी आपापल्या जिल्ह्यांत, तालुक्यांमध्ये आणि राज्यांमध्ये ही याचिका सादर करत आहेत.

"ईश्वरी संजय दहळे ही केवळ दहळे कुटुंबाचीच नव्हे, तर आम्हा सर्व सोनारांची कन्या आहे."

हीच भावना मनात ठेवून, आम्ही, 'सुवर्णकार भारती सेवा संस्थान'चे अधिकारी, ही याचिका सादर करत आहोत. याचिका वर नमूद केल्याप्रमाणे सादर करण्यात आली. यावेळी बोलतांना विजयाताई दहिवाल म्हणाल्या की महिला मुलींच्या संदर्भात त्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा आता खूप महत्त्वाचा आहे. गुन्हेगारी बोकाळत चालली आहे. दिवसाढवळ्या अत्याचारांचे प्रमाण वाढच चालले आहे. गुन्हेगारांनी लहान लहान चिमुरडींनाही सोडलेले नाही. सोनार समजावरील हल्ल्यांमुळे समाजात मोठी चिंता पसरली आहे. सरकारने अशा सर्व समाजातील लेकीबाळींच्या प्रश्नाला अग्रक्रम द्यायला हवा. विकासाचा मुद्दा बाजूला ठेवा आणि महिलांना सुरक्षित वातावरण देण्यावर त्यांनी भर दिला.

## अशोक खरातने सहा महिने..., आणखी एका तरुणीचा खळबळजनक आरोप

● पान ४ वरून ...

फायदा घेत खरातने तिला आपल्या जाळ्यात ओढलं. पीडितेच्या आरोपानुसार, जुलै २०२४ ते डिसेंबर २०२४ या सहा महिन्यांच्या कालावधीत अशोक खरातने तिचं वारंवार लैंगिक शोषण केलं.

या गुन्ह्यात अशोक खरातची गुन्हे करण्याची पद्धत पुन्हा एकदा तीच असल्याचं समोर आलं आहे. इतर पीडितांप्रमाणेच या तरुणीला देखील गुंगीचे औषध पाजून तिच्यावर अत्याचार करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. धार्मिक विधी किंवा सल्ल्याच्या बहाण्याने बोलावून, अमली पदार्थांचा वापर करून महिलांचा फायदा घेतल्याचं याही प्रकरणात घडल्याचं दिसतं.

विशेष म्हणजे पीडित तरुणीनं यापूर्वी शिर्डी पोलीस ठाण्यात अशोक खरातचा ऑफिस बॉय नीरज जाधव याच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. नीरजने तिचे अश्लील फोटो बनवून तिला पाठवले आणि त्रास दिला, असा आरोप तिने केला होता. मात्र, आता तपासात आणि पीडितेच्या नवीन जबाबानुसार, या संपूर्ण प्रकरणामागे अशोक खरातचाच हात असल्याचे समोर आलं असून, खुद्द खरातनेच तिचे शोषण केल्याने तिने आता सरकारवाडा पोलिसांत धाव घेतली आहे.

# महा जम्बो शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | १३ | | | १४ | | ■ |
| | ■ | १५ | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ |
| २० | २१ | | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | |
| ३० | | ■ | ३१ | | ३२ | ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | | ■ |
| ३५ | | | ■ | ३६ | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | ४५ | | | | |
| | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ■ | | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | |
| ५८ | | ■ | | ■ | ५९ | ६० | ■ | ■ | ६१ | ■ | ६२ | | | ■ |
| ■ | ६३ | | ■ | ६४ | | | ६५ | ६६ | ■ | ६७ | | ■ | ६८ | |
| ६९ | | ■ | ७० | ■ | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | ७४ | | ■ |
| | ■ | ७५ | | | ■ | ७६ | ■ | ७७ | | ७८ | ■ | | ■ | ७९ |
| ८० | | | | ■ | ८१ | | | | ■ | ८२ | | | | |

### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टापट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

# जयगाव शिवारातून 8 शेतकऱ्यांच्या पानबुडी मोटारी लंपास; स्विफ्ट कारसह मुद्देमाल जप्त

## ६ जणांवर गुन्हा दाखल; पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या

**सिरसाळा : प्रतिनिधी**
परळी तालुक्यातील जयगाव शिवारात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, कालव्यातील तब्बल ८ ते ९ शेतकऱ्यांच्या पानबुडी मोटारी चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच चोरट्यांसह भंगार खरेदी करणाऱ्या एका दुकानदारावर गुन्हा दाखल केला असून, गुन्ह्यात वापरलेली स्विफ्ट कार जप्त करण्यात आली आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, मौजे जयगाव येथील शेत गट नं. ६२ मधील कॅनॉलमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या शेतीसाठी पानबुडी मोटारी बसवल्या होत्या. २१ मार्चच्या रात्री १० ते २२ मार्चच्या सकाळी ६ वाजेच्या दरम्यान, चोरट्यांनी संगणमत करून या सर्व मोटारी आणि वायर चोरून नेल्या. या प्रकरणी विनायक यशवंतराव शिंदे (वय ४५, रा. जयगाव) यांनी सिरसाळा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी एकूण १,२१,००० रुपये किमतीच्या मोटारी चोरल्या होत्या. यात प्रामुख्याने खालील शेतकऱ्यांच्या मोटारींचा समावेश आहे लक्ष्मण शेंडगे (७.५ HP) - २४,००० रुपये विजयकुमार गडदे, व्यंकटेश करे, अदिनाथ मिसाळ, आसाराम शिंदे (प्रत्येकी ५ HP) - प्रत्येकी १२,००० रुपये संतोष शिंदे, सय्यद दगडू, फेरोजखान पठाण आणि राजेभाऊ मिसाळ यांच्याही ५ HP च्या मोटारी चोरीला गेल्या आहेत. पोलिसांनी या प्रकरणी (१) अर्जुन शिवदास बडे (वय २० वर्षे) (२) शेख नेहाल (वय १९ वर्ष) (३) योगेश पंडीत (वय २१ वर्षे) आणि दोन अल्पवयीन मुलांसह भंगार खरेदी करणारा दुकानदार समीर शेख (रा. सिरसाळा) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी कारवाई दरम्यान चोरीसाठी वापरलेली सिल्व्हर रंगाची स्विफ्ट कार (क्र. MH-14-DF-5461) जप्त केली असून तिची किंमत साधारण २,७०,००० रुपये आहे.
या प्रकरणी गुन्हा (रजि. नं. ७९/२०२६) भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२), ३१७ (२) आणि ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपोनि दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राठोड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.



## विशेष



## मनुरवाडी येथील रस्ता व नाली बांधकामासाठी नागरिकांचे गटविकास अधिकारी यांना स्मरणपत्र

**माजलगाव : प्रतिनिधी**
तालुक्यातील मनुरवाडी येथील नागरिकांनी गल्लीत रस्ता व नाली बांधकामाच्या मागणीसाठी पंचायत समितीकडे स्मरणपत्र सादर केले आहे. दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामपंचायत स्तरावर अर्ज देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.
मनुरवाडी येथील आशोक थोरात यांच्या घरापासून ईसूब शेख यांच्या घरापर्यंत असलेल्या गल्लीत रस्ता व नाली बांधकामाबाबत नागरिकांनी पूर्वीच अर्ज दिला होता. संबंधित ग्रामसेवक यांची सही व शिक्का असलेली प्रतही नागरिकांकडे उपलब्ध आहे. मात्र, आजपर्यंत ना पाहणी झाली ना कामास सुरुवात झाल्याचे दिसून येते.
सदर गल्लीत मातीचा रस्ता असल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचून चिखल निर्माण होतो. नालीची व्यवस्था नसल्यामुळे पाणी चुकीच्या दिशेने वाहते. त्यामुळे स्थानिक नागरिकांना, विशेषत: शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना व मुलींना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.
नाली अभावी साचलेल्या पाण्यामुळे परिसरात वारंवार वाद, भांडणे व मारामारीच्या घटना घडल्या असून भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. तसेच, गल्लीत पाणी साचल्याने वाहनांची ये-जा अडथळली जात असून अनेक वेळा वाहनांना अर्ध्यावरच थांबवावे लागते.
या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ पाहणी करून रस्ता व नाली बांधकामाचे काम हाती घ्यावे, अशी मागणी मनुरवाडी येथील नागरिकांनी केली आहे. या वेळी ग्रामपंचायत सदस्य भिम दशरथ थोरात, आनंद सोळंके, गणेश सावंत, रोहन थोरात, अतुल कामटे, श्री. खोसरे उपस्थित होते.

## कर्नाटकात खळबळ, माजी आमदाराच्या मुलाची हत्या; जळालेल्या कारमध्ये...



धारवाड : कर्नाटकच्या धारवाडजवळील एका निर्जनस्थळी जळालेल्या कारमध्ये कोळसा झालेला मृतदेह सापडल्याने हत्येचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. हा मृतदेह राजू बोलाशेटी यांचा असल्याचे निष्पन्न झाले असून ते बैलहोंगळचे माजी आमदार बाबुराव बोलाशेटी यांचे पुत्र होते. बैलहोंगळमधील उडीकेरी गावचे रहिवासी असलेले राजू प्रामुख्याने शेती व्यवसायात होते आणि सोमवारपासून ते बेपत्ता होते.
कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारभर त्यांचा फोन वाजत होता पण त्यांनी तो उचलला नाही. अखेर मध्यरात्री अडीचच्या सुमारास त्यांचा फोन स्विच ऑफ झाला. सकाळी आपल्या शेतात जाणाऱ्या स्थानिक नागरिकांना जळालेली कार दिसली आणि त्यांनी तात्काळ पोलिसांना पाचारण केले. कारमधील मृतदेह पूर्णपणे जळून कोळसा झाल्यामुळे ओळख पटवणे कठीण होते. मात्र पोलिसांनी कारच्या नंबर प्लेटवरून ही गाडी राजू बोलाशेटी यांचीच असल्याची पुष्टी केली.
प्राथमिक तपासानुसार राजू यांची दुसऱ्या एखाद्या ठिकाणी हत्या करण्यात आली असावी आणि त्यानंतर त्यांचा मृतदेह त्यांच्याच कारमधून रामापूरच्या वेशीवर आणला असावा, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने गुन्हेगारांनी मृतदेहासह कार पेटवून दिली असावी. पोलिसांनी घटनास्थळावरून एक शस्त्र जप्त केले असून, त्याचा सखोल तपास सुरू आहे.
स्थानिक पोलिसांसह फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि ठसे तज्ज्ञांच्या पथकाने घटनास्थळाला भेट देऊन पुरावे गोळा केले आहेत. या हत्येमागचा नेमका उद्देश आणि आरोपींची ओळख अद्याप पटलेली नाही. मात्र पोलिसांनी अधिकृतपणे गुन्हा दाखल केला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी शोधमोहीम तीव्र केली असून सर्व बाजूंनी तपास सुरू आहे.


# दिव्यांग मंत्रालय व आयुक्तालयाची दिव्यांग मुलांबाबतीत अन्यायकारक भूमिका - डॉ जितेंद्र ओव्हाळ

**दिव्यांग विध्यार्थी शिक्षणा पासून वंचित; 7 एप्रिल ला मोर्चा काढणार**

**बीड / प्रतिनिधी :**
बीड १६ जुलै २०२४ रोजी थाटात अनुदान धोरण जाहीर करून प्रस्ताव मागवून घेतले त्याना अनुदान देण्याचं सोडून अनुदानित दिव्यांग शाळा धडाधड बंद करून दिव्यांग विध्यार्थी यांना मुख्य प्रवाहात कसं आणणार असा प्रश्न डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकार परिषदे तून मंगळवारी केला. गेल्या चार महिन्यात अनुदानित शाळा बंद केल्या, त्या शाळेतील शेकडो दिव्यांग विध्यार्थी आज घडीला कुठे आहेत त्याचं शिक्षण चालू आहे का? यांचा ठावठिकाणा सचिव तुकाराम मुंढे तसेंच आयुक्त यांना माहित नसल्याचा आरोप डॉ. ओव्हाळ यांनी केला. तसेंच त्याना शिकवणारा शिक्षक पूर्णपणे रस्त्यावर आणला गेला उदा. नागपूर जिल्ह्यात सावनेरची दिव्यांग शाळा बीड च्या तीन शाळा पुणे सांगली लातूर येथील बऱ्याच शाळेतील दिव्यांग विध्यार्थी शिक्षणापासून वंचित असताना आयुक्त सत्यजित बडे यांची भूमिका बघ्याची का तसेंच डोळे झाकून समायोजन आदेश काढले जात आहेत. कोणताही ताळमेळ नाही निरीक्षक भारत कांबळे यांनी समायोजन आदेश वितरणात घोटाळा केला या वर आयुक्त काय चौकशी करणार दरम्यान आयोजित पत्रकार परिषदेतून डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिव्यांग मंत्रालय व आयुक्तालयाच्या शाळा बंद करून विध्यार्थी शिक्षणापासून वंचित ठेवल्याप्रकरणी व शिक्षक कर्मचारी यांना रस्त्यावर आणल्याप्रकरणी तसेंच अनुदान धोरणासह समायोजन घोटाळा, या बाबतीत दि .०७ एप्रिल रोजी मंत्रालयावर तीव्र आक्रोश मोर्चा काढणार असल्याची घोषणा या वेळी ओव्हाळ यांनी केली.



## अशोक खरातने सहा महिने..., आणखी एका तरुणीचा खळबळजनक आरोप



**नाशिक :** महिलांचं शोषण करणाऱ्या अशोक खरातच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात खरात विरोधात लैंगिक शोषणाचा सातवा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, एका तरुणीने आधी खरातच्या 'ऑफिस बॉय'वर तक्रार केली होती, मात्र आता स्वत: खरातनेच तिचे लैंगिक शोषण केल्याचा खळबळजनक आरोप तिने केला आहे.
नेमकं प्रकरण काय?
तक्रारदार तरुणीची अशोक खरातसोबतची ओळख तिच्या कुटुंबाच्या माध्यमातून झाली होती. शेतात घर बांधण्यापूर्वी धार्मिक सल्ला घेण्यासाठी ही तरुणी आपल्या आई-वडिलांसोबत खरातकडे गेली होती. याच ओळखीचा ● पान ३ वर...

# आचरणासारखे जगात दुसरे भांडवल नाही - श्री ह.भ.प. अच्युत महाराज दस्तापुरकर

**माजलगाव : प्रतिनिधी**
भारतात आचरणाला महत्त्व आहे.
आचरणासारखे जगात दुसरे भांडवल नाही असे प्रतिपादन श्री ह.भ.प. किर्तन केसरी अच्युत महाराज दस्तापुरकर यांनी केले. नाखलगाव येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील सहाव्या दिवशी श्री ह.भ.प. कीर्तन केसरी अच्युत महाराज दस्तापुरकर किर्तन सेवेमध्ये मंगळवारी (दि.२४) बोलत होते.
- देह जावो अथवा राहो, पांडुरंगी दृढ भाव, चरण न सोडी सर्वथा, आण तुझी पंढरीनाथा* या संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या अभंगावर श्री ह.भ.प अच्युत महाराज दस्तापुरकर यांनी प्रतिपादन केले. त्यावेळी बोलताना महाराज म्हणाले की, पैशाचे झालेली नुकसान भरून निघेल. शरीराला झालेला आजार दुरुस्त होईल, परंतु तोंडाला लागलेलं काळ पुसता येणार नाही. यामुळे जीवनात चारित्र्याला महत्त्व आहे. त्याचे जतन तरुणांनी करावे. काही झाले तरी आपण आचरण जपले पाहिजे. पुढच्या पिढीने नामदेवरायांचा हा सल्ला जोपासला पाहिजे. कोणत्याही क्षेत्रात चांगलं वागण्याला महत्त्व आहे. भारतासारखी संस्कृती जगात नाही. जगाला भारताचे तत्त्वज्ञान घ्यावे लागणार आहे. भारत देश हा शांती प्रधान देश आहे. एक दिवस भारत या विश्वाचे नेतृत्व करेल. ही ताकद आपल्या संस्कृतीत आहे. यावेळी पंढरीनाथ महाराज कदम, जीवन महाराज पाटील यांनी किर्तनाला गायनाची साथ दिली. मृदंगाचार्य परमेश्वर महाराज श्रीरामपूरकर, माणिक महाराज गरड, गोरख महाराज सवासे, बळीराम महाराज शिनगारे, वैभव महाराज ताटे, कृष्णा महाराज शिनगारे यांनी मृदंगाची साथ दिली. यावेळी गावकऱ्यांसह परिसरातील दिंद्रुड, बाभळगाव, पिंपळगाव, आलापुर, बेलुरा, गुजरवाडी, वांगी या गावातील भावीक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी गावातील तरुण, वारकरी मंडळी, गावकरी प्रयत्न करत आहेत.



**परंपरा** ➤ सर्वधर्मीय बांधवांना उपस्थित राहण्याचे केले आवाहन

# नगरसेवक शेख खाजाभाई यांच्या वतीने दर वर्षी प्रमाने याही वर्षी 'ईद मिलाप' कार्यक्रमाचे आयोजन

**गेवराई / प्रतिनिधी :**
गेवराई शहरात परंपरा प्रमाणे याही वर्षी नगरसेवक तथा गटनेता शेख खाजाभाई यांच्या वतीने 'ईद मिलाप' या स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व धर्मीय बांधवांनी एकत्र येऊन सलोखा वाढावा असे या मागचे कारण आहे





रमजान ईदचा आनंद सर्वांसोबत साजरा करण्यासाठी शेख खाजाभाई दरवर्षी हा उपक्रम राबवतात. या कार्यक्रमात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, व्यापारी, कष्टकरी आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. परस्परांमधील प्रेम आणि बंधुभाव वृद्धिंगत व्हावा, हा या मागचा त्यांचा उद्देश आहे ईद मिलाप कार्यक्रमाचे
स्थळ : राज गल्ली
दिनांक व वेळ : २७/०३/२०२६ रोजी सकाळी ११ ते ३
या कार्यक्रमाला जास्तीत जास्त हिंदू मुस्लिम बांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन शेख खाजाभाई आणि मित्रपरिवाराने केले आहे.

# सिमेंट रस्ता भ्रष्टाचार प्रकरणात सरपंच यांच्या अपात्रतेच्या कारवाहीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर

**➤ कुटेवाडीच्या सरपंच वरेकर यांच्या अडचणीत वाढ**

**बीड :** नको तिथं वरचढपणा करण्याची सवय लागलेल्या बीडच्या शिवसेना जिल्हा प्रमुखांनी कशात काही मिळेल का? या स्वार्थीपणा मुळे त्यांना चांगलाच झटका लागण्याची शक्यता सध्या दिसते. ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या कामांमध्ये कागदी घोडे नाचवून लाखो रुपयांवर डल्ला मारण्याचा प्रयत्न आजवर त्यांनी केला. मात्र रोहयोमधुन बीडच्या कुटेवाडीतील मंजूर रस्ता न करता तो गिळंकृत केल्याचे प्रकरण आत्ता त्यांना चांगलेच महागात पडणार असल्याचे दिसत आहे. दरम्यान या भ्रष्टचार प्रकरणाचा सरपंच सौ. जयश्री गणेश वरेकर यांच्यावर झेडपीचे सीईओ जतिन रहेमान यांनी ठपका ठेवत विभागीय आयुक्तांकडे अपात्रतेच्या कारवाईसाठी प्रस्ताव पाठविला आहे. यामुळे सरपंच जयश्री वरेकर यांच्यावर अपात्रतेची टांगती तलवार निर्माण झाली आहे.
शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा प्रमुख गणेश वरेकर यांच्या सुविद्य पत्नी सौ. जयश्री गणेश वरेकर ह्या बीड तालुक्यातील कुटेवाडी गावाच्या विद्यमान सरपंच आहेत. गावात विविध विकास योजनांची कामे ही बहुतांश निकृष्ट दर्जाची करण्यात आली असून अनेक बोगस कामे करण्याचा सपाटा त्यांनी लावला. त्यातच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गावातील चरकटी ते अंबाबाई मंदिरापर्यंत रस्ता तयार करणे तसेच अंबाबाई मंदिर ते बापुराव कुटे पर्यंत सिमेंट रस्ता करणे या सिमेंट रस्त्याच्या कामाला ३१ मार्च २०२३ रोजी मंजूरी मिळाली. ही दोन्ही कामांसाठी २० लक्ष रुपयांचा मंजूर करण्यात आले. प्रत्यक्ष कामाला सुरवात दि.१ एप्रिल २०२४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली.
परंतू उबाठा गटाचे जिल्हा प्रमुख गणेश वरेकर यांनी त्यांची पत्नी जयश्री वरेकर यांच्या सरपंच पदाचा गैरफायदा व आपले राजकीय प्रस्थ वापरुन चरकटी ते अंबाबाई मंदिरापर्यंत रस्ता तसेच अंबाबाई मंदिर ते बापुराव कुटे पर्यंत सिमेंट रस्त्यांची कामे न करता अकुशल निधी उचला. तसेच कुशल निधीची मागणी नागपूर येथील नरेगाचे आयुक्तांकडे करण्यात आली होती. परंतू गावातील या दोन्ही सिमेंट रस्त्याचे कामे न करता निधी हडपला जात असल्याचे लक्षात येताच तक्रारदार नंदकुमार कुटे यांनी या गंभीर प्रकरणाची तक्रार झेडपीचे सीईओ यांच्याकडे केली. त्या अनुषांगाने चौकशी समिती स्थापन करण्यात येवून दरम्यान चौकशी समितीने गावात येवून रस्त्याची पाहणी केली असता मंजूर ठिकाणी कुठेही सिमेंट रस्ता न केल्याचे आढळून आल्यानंतर समितीने आपला अहवाल वरिष्ठांकडे सादर केला. त्यानुसार सीईओ जितिन रहेमान यांनी सदर झालेल्या भ्रष्टचार प्रकरणात गणेश वरेकर यांच्या पत्नी सरपंच सौ. जयश्री वरेकर यांना दोषी धरुन त्यांच्यावरील अपात्रतेच्या कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविला असून लवरकरच याप्रकरणात सरपंच जयश्री वरेकर यांच्यावर आपत्रतेची कारवाई होण्याची शक्यता आहे. तसेच याप्रकरणात दोषी ग्रामसेवकांची विभागीय चौकशी तर झेडपीचे उप अभियंता, तांत्रिक साहाय्यक, ग्रामपंचायतीचे अतिरिक्त रोजगार सेवक यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होणार असल्याची माहिती तक्रारकर्ते नंदकुमार कुटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# ऊसतोड मजूर महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न

माजलगाव / प्रतिनिधी :
तालुक्यातील निपाणी टाकळी ऊसतोड मजूर महिलांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन निपाणी टाकळी येथे दि २४ रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महिलांची तपासणी करून त्यांना आवश्यक औषधोपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.
या कार्यक्रमाला प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर (मार्गदर्शक) व प्रा. डॉ. एन. बी. तेली (चेअरपर्सन), फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच श्री सुगत रत्न गायकवाड (फिल्ड कोऑर्डिनेटर) यांनीही मार्गदर्शन केले.
एनएसएल शुगर, पवारवाडी युनिट क्रमांक ३ चे एमडी मूर्ती साहेब, एचआर मॅनेजर देवाप्पा जोगरे, ज्युनिअर एचआर मॅनेजर यासीन सरकार तसेच केन विभागाचे एजीएम दत्तात्रय आहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कॅम्प घेण्यात आला.
डॉ. आशिया मॅडम व सीएचओ खरात (आडगाव) यांनी ऊसतोड मजूर महिलांची सखोल तपासणी करून औषधोपचार केले व आरोग्यविषयक सल्ला दिला. या शिबिरात आशा वर्कर, अंगणवाडी मदतनीस तसेच कारखान्यातील वसंत चव्हाण यांनी सहकार्य केले.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री पाटील साहेब व चौरे मॅडम यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या आरोग्य शिबिरात एकूण ३३ महिला व पुरुषांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या शेवटी श्री शेख शहाबुद्दीन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

